RNI No: MAHMAR/2004/13776 ✸ Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On: 12 Oct 2014 ✸ Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 15 Oct 2014

अजायब ✵ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : बारा | अंक : चौथा | ऑक्टोबर २०१४



अमृतवेळ (ध्यान–अभ्यासापूर्वी दिलेला संदेश) 4

प्रवासी (सत्संग) 5

अनमोल वचन (कार्यक्रम अखेरीस दिलेला संदेश) 25

धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती) 34

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई – 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई – 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

अमृतवेळ

परम संत अजायब सिंहजी महाराजांनी ध्यान–अभ्यासास बसविण्यापूर्वी
प्रेमींना दिलेला संदेश – १६पी एस राजस्थान

तू मेरा पिता, तू है मेरा माता, तू मेरा बंधप, तू मेरा भ्राता. (२)
तू मेरा राखा सबनी थांई, तां भौ कहा काड़ा जिओ, तू मेरा पिता....

१. तुमरी कृपा ते तुध पछाना, तूं मेरी ओट तूं है मेरा माना, (२)
तुध बिन दूजा अवर ना कोई, सब तेरा खेल अखाड़ा जिओ,तू मेरा पिता...

२. जीया जंत सब तुध अपाऐ, जित–जित भाणा तित्त–तित्त लाऐ, (२)
सब किछ कीता तेरा होवै, नाहीं किछ असाड़ा जीओ, तू मेरा पिता...

३. नाम ध्याये महासुख पाया, हर गुण गाऐ मेरा मन सितलाया, (२)
गुरु पूरे बजी वधाई, 'नानक' जीता बिखाड़ा जिओ, तू मेरा पिता...

बंधुंनो, परमात्म्याच्या अपार कृपेमुळे आपण रोज आपल्या मनास जबाब देऊन ध्यान–अभ्यासास बसत आहोत. आपण मनाचे सांगणे ऐकू नये, मनास सक्त जबाब देऊन ध्यान–अभ्यासास बसावे.

ज्याप्रमाणे समुद्री जहाजावर बरेचसे कावळे असतात. त्यांनी कितीही लांब उडत जाण्याचा प्रयत्न केला, तरी शेवटी बसण्यासाठी त्यांना जहाजावरच परत यावे लागते. आपल्या मनाची सुद्धा हीच परिस्थिती आहे, मनाच्या पाठी जाऊ नका. ते हवं तिथे पळत जरी राहिले, तरी तुम्ही तिसऱ्या तिळावर एकाग्र–चित्त व्हा. मनास शांत करा, शांत मनच ध्यान–अभ्यास करू शकते. ध्यान–अभ्यासास घरी बसला असाल का इतर कोणत्याही ठिकाणी बसला असाल, तरी आपले ध्यान तिसऱ्या तिळावर केंद्रित करा. आता डोळे बंद करून आपला ध्यान–अभ्यास सुरू करा.

***

प्रवासी

सत्संग : परम संत अजायब सिंहजी महाराज,
हुजूर स्वामीजी महाराजांची वाणी, मुंबई – ८ जानेवारी १९८४

आपल्यासमोर दोनच मार्ग आहेत, एक गुरुमत तर दुसरा मनमत. मनुष्य जन्मामध्ये आपणांस स्वातंत्र्य असते की, आपण गुरुमत मार्गाचा अवलंब करावा की मनमत मार्गाचा अवलंब करावा. मनमत मार्गाचा अवलंब केल्याने आपले अनेक प्रकारे नुकसान होते, जीवनामध्ये त्रुटी निर्माण होऊन, ते व्यर्थ जाते. सत्संगामध्ये संत महात्मा आपणांस मनमत मार्गातील त्रुटी वर्णन करून सांगतात, तसेच ते गुरुमत मार्गाचे व मनुष्यजन्माचे फायदे सविस्तर समजावून सांगतात की परमात्म्याने आपणांस मनुष्यजन्म का दिला?

परमात्म्याने स्वत: चौऱ्याऐंशी लक्ष योनींची निर्मिती करून, प्रत्येक जीवास आपआपल्या कर्मांनुसार जन्म दिला आहे. प्रत्येक जन्मात (योनीत) आपणांस मुले–बाळे लाभली, आपण सुख–दु:ख भोगत तसेच गर्मी–सर्दीसुद्धा सोसत आलो आहोत. परंतु परमात्म्याने मनुष्य–जन्मास सर्वश्रेष्ठ योनी म्हणून नेमले आहे. आपणांस कल्पना आहे की, मनुष्य जेवढा मोठा, त्याच्या जबाबदाऱ्या देखील तेवढ्याच मोठ्या असतात. मोठ्या शिराची डोकेदुखीसुद्धा मोठीच असते.

जी कामे आपण इतर योनीत करू शकत नाही, ती कामे मनुष्यजन्मामध्येच करू शकतो. परमात्म्याची भक्ती, परमात्म्याची भेट आपण मनुष्यजन्मामध्येच करू शकतो. आपण जर हा जन्म वाया घालविला, ही संधी गमावली, तर आपला पुढचा जन्म कोणता असेल याची आपणांस कल्पनादेखील नाही. कदाचित त्या जन्मामध्ये परमात्म्याकडे जाण्याची चुकूनही संधी लाभणार नाही. त्यामुळे महात्मा आपणांस सांगतात की आपणांस जो काही वेळ मिळालेला आहे, त्याचा पुरेपूर फायदा करून घ्यावा.

मनुष्यजन्म अमृतसरोवरासमान आहे. यामध्ये परमात्म्याने अमृत काठोकाठ भरून ठेवलेले आहे. या शरीरात आपला शत्रू तसेच आपले मित्र व हितकर देखील बसलेले आहेत. आपण सर्वजण आपआपल्या दृष्टीकोनाने म्हणतो की, आम्ही गुरुमतानुसार मार्गक्रमण करीत आहोत. पुढे जाऊन सत्संगांमध्ये मी तुम्हांस समजावून सांगेन की, खऱ्या गुरूमताची सुरुवात कोठून होते आणि कशातऱ्हेने आपण मनमत मार्गासच गुरूमत समजून बसलो आहोत?

महात्मा आपणांस सांगतात, मनात येईल त्याप्रमाणे वागणे, मद्यमांसाहार करणे व विषय–विकार भोगणे म्हणजेच मनमत होय. आजकालच्या युगामध्ये आपण पाहतो की, थोडावेळदेखील आपले मन स्थिर राहत नाही. दिवसभर आपण अवाचनीय लिखाण वाचत असतो, तसेच चित्रपट पाहतो. त्यानंतर आपण म्हणतो की नाम जपण्याकरीता माझ्याकडे वेळच नसतो, माझे लक्षच लागत नाही. एखाद्या दिवशी चुकून माकून जर ध्यान–अभ्यासास बसलो, तर सतगुरुंना लगेच आपण पत्र पाठवितो की, महाराजजी! मी काल ध्यान–अभ्यासासाठी बसलो होतो, परंतु अंतर्यात माझी काही प्रगती झाली नाही. तुम्ही चित्रपट पाहाताना तासन्तास एका जागेवर बसून राहता, तुमच्या नेत्रांवर त्या प्रकाशाचा किती दुष्परिणाम होतो? तुम्ही कधी त्या चित्रपट निर्मात्यांना पत्र लिहिले की माझी परमार्थामध्ये काहीच उन्नती झाली नाही. हेच मनमत आहे. तुम्हांस फसविण्याकरीताच हा सर्व खटाटोप मन करीत असते. हे मनाचेच कारस्थान असते.

महाराज सावन सिंहजी सांगत असत की, ''मन काळाचा प्रतिनिधी आहे, ते त्याच्या मालकाच्या आदेशाची अतिशय इमानदारीने अंमलबजावणी करते. ते कधीही त्याच्या मालकाशी बेईमानी करीत नाही, कृतघ्न बनत नाही. मन जर त्याचे कर्तव्यपालन करण्यामध्ये चुकत नाही, तर आपलेदेखील कर्तव्य आहे की आपण आपल्या परमात्मारूप सतगुरुंच्या आदेशाचे पालन करावे, त्यांनी सांगितलेले कार्य करावे.''

आपले सतगुरू महाराज कृपाल सांगत असत,''जर दुष्ट मनुष्य आपला दुष्टपणा व दुष्कृत्ये करणे सोडत नसेल, तर मग भल्या मनुष्याने आपला चांगुलपणा व सत्कृत्ये करणे का सोडावे?'' आपले मन जर आपणांस दुष्कृत्ये करण्यास प्रेरित करण्याचे काम सोडत नसेल, तर आपलेदेखील कर्तव्य आहे की, आपण मनाची संगत त्यागून, अशा लोकांच्या संगतीत जावे, ज्या लोकांनी या जीवनाचे रहस्य उलगडले आहे.

स्वामीजी महाराज सांगतात, ''तुमच्या अंतर्यात परमात्म्याने अमृताचा प्रचंड साठा ठेवलेला आहे. परंतु ते अमृत आत्मा प्राशन करू शकत नाही. त्याचे प्राशन काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार करीत आहेत. यास कारण म्हणजे आपले पारमार्थिक भांडे आपण उलटे करून ठेवलेले आहे, त्यामुळे त्यामध्ये अमृताचा एकही थेंब पडत नाही. आपणांस कल्पना आहे की जर एखादे भांडे उपडे ठेवलेले असल्यास, त्या भांड्यावर वर्षभर जरी पर्जन्यवृष्टी होत राहिली, तरीही त्या भांड्यामध्ये पाण्याचा एकही थेंब पडू शकत नाही. तेच भांडे आपण जर सुलटे करून ठेवले, तर ते एका नाही तर दुसऱ्या पावसाच्या सरीने नक्कीच भरेल.'' गुरू नानक देवजी सांगतात :

ऊन्दे भांडे कछु न समावे, सीधे पवे अमृत धार।

आपण आपल्या हृदयरूपी कमळास (भांड्यास) सुलटे ठेवणे गरजेचे आहे. नामाची चढण वरील दिशेने आहे. आपण जेव्हा आपल्या घराच्या दिशेने, सचखंडाच्या दिशेने वाटचाल करू लागतो, तेव्हा आपले हृदयकमळ आपोआपच सुलटे होते. त्यामुळे जे अमृत आपले पाच कट्टर शत्रु प्राशन करीत असतात, ते अमृत आपल्या आत्म्यास मिळू लागते.

महाराज कृपाल सांगत असत,''आपल्या शरीरास अन्नाची गरज जेवढी महत्त्वाची आहे असे आपण मानतो, त्याहीपेक्षा अधिक आत्म्यास त्याच्या अन्नाची गरज आहे. कारण आपला आत्मा जन्मजन्मांतरापासून भुकेलेला आहे. त्यामुळे आपण जोपर्यंत आत्म्यास त्याचे अन्न देत नाही, तोपर्यंत

आपण आपल्या शरीरास अन्न देऊ नये.'' महाराजजी असेदेखील म्हणत की, ''आपण शंभर कामे सोडून सत्संगास जावे व हजार कामे बाजूस ठेवून ध्यान–अभ्यासासाठी बसावे.''

आपल्या अंतरात पाच ठगांनी एक प्रकारचे जाळे पसरवून ठेवलेले आहे. आपण जेव्हा कामवासनेपासून आपली सुटका करून घेण्याचा विचार करतो, तेव्हा क्रोध आपल्या मागे लागतो, क्रोधापासून सुटका करून घेण्याचा विचार करतो, तेव्हा आपणांस लोभ घेराव घालतो. कबीर साहेब सांगतात :

कामी क्रोधी लालची इनसे भक्ति न होए।
भक्ति करे कोई सूरमा जाति वर्ण कुल खोए।।

या पाच ठगांच्या आहारी गेलेला मनुष्य कधीच शांत व तृप्त राहू शकत नाही. तुम्हास कल्पना आहे की क्रोधी मनुष्य इतरांचा विचार करीत नाही. तोंडात जे काही येईल, तो ते बोलून जातो. त्यावेळी तो मनुष्य असा विचार करीत नाही की हे शब्द इतर कोणी माझ्यासाठी वापरले, तर मला किती वाईट वाटेल? परंतु आपण जेव्हा आपल्या आत्म्यास शब्द–नामाचे रसपान करवितो, तेव्हा आपली या ठगांपासून सुटका होते. आपल्या अंतर्यात शब्द–नामाचे साम्राज्य पसरते. हुजूर महाराज सांगत असत, ''हे पाच ठग आपले कट्टर शत्रू आहेत, ते आपली फसवणूक करीत असतात. कामामुळे शरीरास अनेक वाईट व्याधी ग्रासतात. कामी मनुष्य नामाची कमाई करूच शकत नाही, कारण कामामुळे आत्मा खाली अज्ञानतेच्या खड्ड्यात जाऊन पडतो.''

अशीच अवस्था क्रोधीची असते. क्रोधामुळे त्याचे रक्त जळून जाते. त्यास उच्च रक्त–दाबासारखे अनेक प्रकारचे आजार जडतात. क्रोधी माणसाने जर एखाद्या डॉक्टरकडे स्वत:च्या प्रकृतीविषयी सल्ला विचारल्यास, ते डॉक्टर त्यास समजावतील की क्रोधामुळे त्याचे किती नुकसान होत आहे? क्रोधाचा त्याच्या प्रकृतीवर किती वाईट परिणाम होत आहे? म्हणूनच महात्मा आपणांस प्रेमाने समजावतात की क्रोधापासून आपण दूर राहावयास हवे.

जेव्हा आपली काम–क्रोधापासून सुटका होते, तेव्हा लोभ आपणांस घेरतो. लोभामुळे कधी सत्तेची नशा चढते, तर कधी तो आपणांस धन–संपत्ती कमविण्यासाठी प्रेरीत करतो. अखेरीस आपणांस अज्ञानतेच्या खड्ड्यात ढकलून तो नामानिराळा होतो. अशा खड्ड्यांमध्ये पडलेला मनुष्य आयुष्यभर त्यांमधून बाहेर पडण्याचा विचारदेखील करू शकत नाही व स्वत:हून तो अशा खड्ड्यांमधून बाहेर पडूही शकत नाही.

महात्मा समजावतात की, आपण अशा सतगुरुंकडे जावे, जे आपणांस नामरूपी अस्त्र देतील, ज्याच्या मदतीने आपण या पाच डाकूंशी लढा देऊ शकू. सतगुरू जेव्हा आपणांस नाम देतात, तेव्हा ते आपणांस शब्द–ध्वनीने सुसज्ज करतात. आपणांस आयुष्यभर अशा जिद्दी शत्रूशी लढा द्यावा लागतो, जो कधीही स्वत:ची हार मानत नाही. तुलसी साहेब सांगतात:

तुलसी रण में जूझना घड़ी एक का काम।
नित उठ मन से जूझना बिन खंडे संग्राम।।

रणांगणावरील लढाई काही वेळापुर्तीच मर्यादीत असते. तेथे लढाई करणारा एक तर स्वत: मरतो वा शत्रूस मारतो. तेथे आपला अथवा दुसऱ्याचा विजय होतो. परंतु ही तर दररोजचीच लढाई आहे. ही लढाई प्रत्यक्ष हत्यारांशिवाय करावी लागते. या लढाईसाठी सतगुरूंनी आपणांस शब्द–नामाचे हत्यार दिलेले आहे. आपण जर ही लढाई करीत विजय प्राप्त केला, तर सतगुरू आपणांस परमपदाचे बक्षिस देतात. सतगुरू अन्यायी नाहीत, ते तर आपणांस बक्षीस देण्यास सदैव तत्पर असतात. त्यासाठी आपणदेखील आपले लक्ष, आपले ध्यान परमात्म्याकडे देत आपला लढा जारी करावयास हवा. आपणांस हे पाच चोर सातत्याने त्रस्त करीत असतात. त्यामुळे त्यांच्यापासून आपली सुटका होण्यासाठी आपण सतगुरूंना शरण जाणे गरजेचे आहे. सतगुरूंनी या चोरांना स्वत:च्या काबुत केलेले असते. ते आपणांवर कृपा करीत आपणांस शब्द–नामाचे बक्षिस देतात. जर सतगुरूंनी

दर्शवलेल्या मार्गावर आपण चालत राहिलो तर आपणदेखील जिवंतपणीच या चोरांना काबूत आणू शकतो. परंतु या कामामध्ये आपण का बरे यशस्वी होत नाही? ही विचार करण्याची बाब आहे. कबीर साहेब सांगतात:

जैसी लौ पहले लगी, तैसी निबहे ओड़ ।
अपनी देह की क्या गत, तारे पुरुष करोड़ ।।

आपल्या हृदयात जेव्हा नाम घेण्याची इच्छा निर्माण होते, विरह व तळमळ निर्माण होते व आपण नाम घेतो, तेव्हा सुरुवाती–सुरुवातीला ध्यान–अभ्यासासाठी मुबलक वेळ व्यतीत करतो व अंतर्यात प्रगतीदेखील करतो. आपण हे देखील सांगतो की आपल्या अंतर्यात खूप प्रकाश आहे. परंतु हळू–हळू आपले मन आपली परमार्थातील रूची कमी–कमी करू लागते. त्यामुळे आपला ध्यान–अभ्यास व आपले सतगुरूप्रेम घटू लागते.

सुरुवातीस करीत असलेल्या ध्यान–अभ्यासाच्या तुलनेत आपणांस नंतर त्याचे महत्त्व कमी–कमी वाटू लागते. सुरुवातीस परमार्थाविषयी आणि सतगुरूंप्रती असलेले प्रेम जर अखेरीपर्यंत टिकले, तर असे प्रेम करणारा मनुष्य केवळ स्वत: तरणे काय, तो इतर करोडो पुरुषांचा उद्धार करतो. तुमच्यासमोर स्वामीजी महाराजजींची वाणी सादर केली जात आहे, जी अतिशय काळजीपूर्वक ऐकण्यासारखी आहे:

मुसाफिर रहना तुम होशियार, ठगों ने आन बिछाया जाल।।

आपण दिवसभर म्हणत असतो की माझा अवाढव्य वाडा आहे, माझी इतकी मुले आहेत, मी इतक्या धन–संपत्तीचा मालक आहे, मी इतक्या मोठ्या समाजाचा प्रतिनिधी आहे, परंतु संत–महात्मे आपणांस **'प्रवासी'** असे संबोधतात. एखाद्या ठिकाणी रात्रभर थांबून, सकाळी तेथून निघून जाणाऱ्या मनुष्यास प्रवासी म्हटले जाते. गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात:

बटाऊ से जो लावे नेह, ताके हाय न आवे खेह।

एखाद्या **प्रवासी** व्यक्तीशी प्रेम करणाऱ्याच्या हाती काय लागेल? तो **प्रवासी** सकाळी न सांगताच तेथून निघून जाईल. याचप्रमाणे आपणदेखील **प्रवासी** आहोत. आपणांस कल्पना नाही की आपला मृत्यु कधी होईल? कधी आपणांस ईश्वरी बोलावणे येईल? मृत्युसमयी आई मुलास सांगून जात नाही, तर मुलगा आईशी सल्लामसलत करीत नाही की मी कोठे जात आहे? पती–पत्नीच्या प्रेमास अतिशय महानता दिली जाते, कारण ते प्रेम जन्मभर एकमेकांना साथ देणारे असते. परंतु अंतसमयी पती–पत्नी एकमेकांशी चर्चा वा सल्लामसलत करू शकत नाहीत की त्यांना कधी जायचे आहे? म्हणूनच महात्मा आपणांस सांगतात, ''इतके असूनही आपण स्वत:स **प्रवासी** मानत नाही. तुम्ही सज्ञानतेने व सतर्कपणे विचार करा की येथे कोणती वस्तु तुमची स्वत:ची आहे?''

मोहम्मद साहेबांचे अनेक शिष्य होते. मोहम्मद साहेबांच्या हृदयामध्ये विचार आला की, माझ्यापश्चात या शिष्यांनी आपआपसामध्ये वादविवाद करू नये. त्या शिष्यांपैकी खऱ्या अर्थाने माझी शिकवणूक ग्रहण केलेला असा कोणता शिष्य आहे? साधारणत: संतांची शिकवणूक खऱ्या अर्थाने समजू शकणारी वा त्यांनी सांगितल्याप्रमाणे आयुष्य व्यतीत करणारी खूप कमी लोकं असतात.

मोहम्मद साहेबांनी त्यांच्या सर्व शिष्यांना उन्हात उभे करून विचारले की, तुमच्याकडे कोणकोणते सामान आहे? स्वत:स मोहम्मद साहेबांचा खास शिष्य समजणारा हजरत उमर मानत असे की, मीच सर्व कारभार सांभाळत आहे. मला खूप लोकं ओळखतात. त्याने त्याच्या सामानाची गणती सुरू केली की, माझे इतके उंट आहेत, माझी इतकी धन–संपत्ती आहे, माझे इतके आलिशान वाडे आहेत. या सर्वांची गणती तो तासभर करीत राहिला. हजरत अली यास मोहम्मद साहेबांच्या पारमार्थीक रहस्याचे ज्ञान होते. तो मोहम्मद साहेबांच्या नंतर, त्यांच्या गादीचा वारस बनला.

हजरत अली उठून उभा राहिला आणि म्हणाला, ''एक खुदा आहे, ज्यास मी पाहिलेले नाही; दुसरे तुम्ही आहात, ज्यांना मी पाहू शकतो. माझ्यासाठी राम-रहीम, खुदा-अल्लाताला सर्वकाही तुम्हीच आहात.'' अशा रीतीने मोहम्मद साहेबांनी संगतला आडमार्गाने समजावण्याचा उद्देश होता की ज्यांचे सतगुरूंवर प्रेम असते, ते सतगुरूंशिवाय इतर कोणत्याही वस्तूस आपले मानत नाहीत.

कल्ला आया हैं कल्ला जाएंगा, दूजा गुरु है अगर ध्याएगा।

कबीर साहेब सांगत आहेत,''तू मुठ बंद ठेवून जन्म घेतलास व मुठ उघडी ठेवून येथून निघून जाणार आहेस. ज्या सतगुरूंनी आपणांस शब्दनामाचे रहस्य समजावले आहे, केवळ तेच आपल्यासोबत जाणार आहेत, परंतु आपणांस त्यांच्याबद्दल प्रेम व आपुलकी नाही.''

मी २४ पी. एस. गावातील घटना सांगतो. तेथे महाराज सावन सिंहजींद्वारा नाम प्राप्त झालेली वृद्धा राहत असे. तिच्या कुटुंबातील लोक मद्य-मांसाचे सेवन करीत असत. ती मात्र जमेल त्याप्रमाणे दररोज नित्यनेमाने, प्रेमभावाने ध्यान-अभ्यास करीत असे. तिचा अंतसमय आला असता तिची मुले व नातवंडे म्हणू लागली, तुझ्या मुलींना बोलावून घ्यावे काय? कारण साधारणत: स्त्रियांना त्यांच्या मुलींबद्दल विशेष आपुलकी व जवळीक असते व मृत्युसमयी आपण सर्व मुला-मुलींना जवळ बोलावून घेण्यासाठी संदेश पाठवितो. परंतु मुला-मुलींना जवळ बोलावण्याइतपत मृत्यु वेळ देत नाही. जर इतका वेळ दिला, तर तो मृत्यु कसला? मृत्युचे बोलावणे आल्यावर कोणासही बोलवून घेण्याची संधी मिळत नाही.

ती माता जिवंत असेपर्यंत कोणीही तिचा आदर करीत नसे. त्यांना तर याची कल्पनादेखील नव्हती की, मातेला कोणा महात्म्यांद्वारे नाम प्राप्त झालेले आहे वा तिचे सतगुरू इतके बलशाली आहेत. जेव्हा ती माता शरीर सोडू लागली, त्या वृद्धेने आपला अनुभव त्यांस सांगितला की, माझे सतगुरू

माझ्या समीप उभे आहेत. त्यांचे वस्त्र व दाढी श्वेत रंगाची आहे. त्याघटनेचा त्या कुटुंबावर चांगला परिणाम झाला. त्यानंतर सर्व कुटुंबियांनी नाम घेतले व ते शाकाहारी जीवन जगू लागले. भलेही त्या वृद्धेच्या मृत्युनंतर कुटुंबियांवर सत्संगाचा प्रभाव पडला, परंतु ती ज्या विश्वासाने शब्द–नामाची कमाई करत असे, त्या विश्वासामुळेच तिचे सतगुरू तिच्याजवळ आले.

महाराज सावन सिंहजी सांगत असत,''संत सत्संगीच्या कुळाचा उद्धार करतात. अशी अनेक उदाहरणे आहेत, जेथे सतगुरू येतात आणि आत्म्यास घेऊन जातात. ज्यांचे प्रेम व ध्यान गुरूचरणी लागलेले असते, त्यांनाच सतगुरू घेऊन जातात.'' अंतसमयी जर आपण मुला–मुलींना बोलावून घ्यावे असे म्हटले, तर त्याचा काय उपयोग? कारण ते येऊन आपली काही मदत करू शकत नाहीत. महात्मा प्रेमाने समजावतात की आयुष्यभर सत्संग आणि ध्यान–अभ्यास करविण्याचा हेतू हाच असतो की आपले लक्ष सतगुरुंवर एकाग्र रहावे व मृत्युसमयी देखील आपले लक्ष सतगुरूंकडे केंद्रित व्हावे.

महाराज सावन सिंहजी सांगत असत,''तराजुची जी बाजू जड असेल, तीच बाजू खाली झुकेल. त्याचप्रमाणे मृत्युसमयी ज्यांची आठवण आपणांस येईल, त्यांच्याकडेच आपण मृत्युनंतर जाऊ.''

महात्म्यांनी हे समजावण्याचे एकच कारण आहे की, काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार हे चोर त्यांचा कार्यभाग आटोपून आपणांस येथेच सोडून जातात. आपण जेवढे कामाग्नीच्या आहारी जाऊ तेवढे आपले प्रकृतीमान बिघडते. क्रोधामुळे अनेक भयानक आजारांनी आपण घेरले जातो. लोभाच्या आहारी गेल्यावर आपण आपल्या तत्त्व–मूल्यांचा त्याग करून चोरी–बेइमानी करू लागतो, पैशांचा संग्रह करू लागतो. ते धन औषधोपचारासाठी डॉक्टरांची फी देण्यात वा इतर एखाद्या वाममार्गी खर्च होईल किंवा त्या संपत्तीच्या मदतीने सुखोपभोगांच्या सामानांचा संग्रह करून आपण निघून जाऊ व आपला एखादा मुलगा ती संपत्ती व्यर्थ गमावेल.

माया बदलत राहणाऱ्या सावली समान असते. सावली सकाळी एका ठिकाणी असते तर संध्याकाळी दुसऱ्या ठिकाणी असते. महात्मा आपणांस प्रेमाने समजावतात की तुम्ही येथे चोरांच्या देशात आलेला आहात. परमात्म्याने या जीवनात जो काही वेळ दिलेला आहे, तो काळ तुम्ही सावध राहून जगा.

आपल्या सर्वांचे आपापसामध्ये स्वार्थी प्रेम आहे. भाऊ–बहिणीचे प्रेम तसेच पती–पत्नीचे प्रेमदेखील स्वार्थापोटीच असते. आपण जेव्हा निर्धन होतो, तेव्हा कोणीही आपल्याशी नाते जोडण्यात खूष नसतो. आपल्याकडे जर धन–संपत्ती असेल, तर सर्वजण ताबडतोब आपल्याशी नाते–संबंध जोडतात. ते म्हणतात की हा आमच्यापैकीच आहे, मग भलेही आपण त्यांच्या कुळातील देखील नसू. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

जगत में झूठी देखी प्रीत।
अपने ही हित स्यों सब लागे, क्या दारा क्या मीत।।
मेरो मेरो सबहो कहते है, हित स्यों बांध्यो चीत।
अंत काल संगी नह कोई, यह अचरज है रीत।।

सर्वांचे प्रेम स्वार्थापोटीच असते. स्वार्थपूर्ती झाल्यानंतर कोण कोणास विचारतो? अनेकदा नात्या–नात्यामध्ये इतकी विचित्र परिस्थिती येते की आपणांस म्हणावे लागते की अमुक व्यक्तीने माझ्याशी चुकीची वर्तणूक केली. परंतु तरीही आपले मन त्यांच्यापासून दूर जात नाही. ते म्हणते आपला माणूस शेवटी आपलाच असतो. खरेतर आपला असा केवळ परमात्माच असतो, ज्यास आपण आपलासा मानत नाही. या जगास मात्र आपण आपलेसे करण्याचा प्रयत्न करीत राहतो, परंतु सत्य हे आहे की, हे जग आजपर्यंत ना कोणाचे झाले आहे, ना ते भविष्यात कोणाचे होईल.

महात्मा आपणांस समजावतात की, ही धरती एखाद्या वेश्येसमान आहे. वेश्येकडे अनेकजण येतात. परंतु ती कोणावरही खरे प्रेम करीत नाही. लोक तिच्याकडे येतात, धन उधळत कुकर्म करून, धर्मभ्रष्ट करून निघून जातात.

या धरतीची अवस्था अशी आहे की, कित्येकजण हीचे मालक झाले व शेवटी तिला सोडून निघून गेले. कल्पना नाही की भविष्यात हीचे कितीजण मालक होणार आहेत? सर्वजण या जगातून निघून जातात, परंतु धरती तिच्या जागेवरच आहे. बुल्लेशाहजी सांगतात:

बुल्लेया साड़ा ओत्थे वासा, जित्थे बहुते अन्ने।
न साड़ी कोई कद्र पछाणें, न सानूं कोई मन्ने।।

आपण या अंध व ठगांच्या राज्यात आलेलो आहोत. येथे ना कोणाला कोणाची कदर आहे, ना कोणी कोणाचा मान–सन्मान करतो. जर कुणी मान–सन्मान करीत असेल, तर तो त्याच्या स्वार्थापोटी करीत असतो. स्वार्थ संपल्यावर कोण कोणास विचारतो?

अकेले मत जाना इस राह, गुरु बिन न होगा निर्वाह।।

आपण या जगातदेखील एखाद्या ठिकाणी जेव्हा प्रवासासाठी जातो, तेव्हा त्याची पूर्वतयारी करतो की, आपणांस काश्मीर, दिल्ली किंवा कलकत्ता येथे जायचे आहे. आपण विचार करतो की, आपण कोणत्या मार्गाने जावे, वाटेत कोणकोणती स्टेशन्स येतील, खाण्याची काय सोय होईल? परंतु एक असा देखील प्रवास आपल्या नेत्रांसमोर येणार आहे, ज्या प्रवासास आपण टाळू शकत नाही. त्या प्रवासाबद्दल आपण कधी विचार केला आहे का की तो किती खोलवरचा व दुरचा प्रवास आहे? त्या प्रवासामध्ये कसल्या खर्चाची गरज आहे? गुरू नानकदेवजी महाराज सांगतात :

जहं मार्ग के गने जाए ने कोसा, हरि का नाम ऊँहा संग तोसा।।

नामाशिवाय आपल्या सोबत इतर कोणतीही वस्तु जाऊ शकत नाही. परंतु नामाचा संग्रह कधी तुम्ही जमा केलात का? त्यामार्गाने तू एकटाच जाणार आहेस. वाटेत ठग बसलेले आहेत. अंतर्यात काळाने अनेक फसव्या वाटा बनवून ठेवलेल्या आहेत. तुला कोठे जायचे आहे याचे ज्ञान नाही, म्हणून तू एखाद्या जाणकार व्यक्तीस सोबत घे.

एखाद्या मनुष्यास अमेरीकेस जायचे असल्यास तो काय करील? तो तेथील माहिती करून घेईल. अमेरिकेला जाऊन आलेल्या एखाद्या मनुष्याच्या सोबत राहून त्याच्या अनुभवाचा फायदा करून घेतला पाहिजे, कारण त्यास कल्पना आहे की अमेरिकेस जाणारे विमान कोठून जाते? ते कोठे उतरणार?

याचप्रमाणे परमात्मा प्रिय संत–महात्मे, सच्चखंडामधून येतात. त्यांना अंतर्यातील सर्व मार्गांचे ज्ञान असते. त्यामुळे आपण स्वत:स त्यांच्या सुपूर्त केल्यास आपण कोणत्याही अडचणींशिवाय तेथे पोहचू शकतो. सतगुरूंशिवाय आपला निर्वाह होऊ शकत नाही, त्यांच्याशिवाय आपणांस इतर कोणीही अंतर्यात नेऊ शकत नाही.

जमा सब लेंगे तेरी छीन, करेंगे तुझको अपना दीन।

स्वामीजी महाराज सांगत आहेत,''तू जी काही येथे दान–पुण्याची पुंजी जमा केलेली आहेस, ती पुंजी वाटेत काळ हिरावून घेईल, तुला त्याचा दास बनवेल.'' गुरू नानकदेवजी महाराज सांगतात,''पुढे डोंगर–पर्वतांची चढण चढायची आहे, डोक्यावर पाप–पुण्याचे ओझे आहे. तेथे आपली पुण्यंदेखील सुटका करवू शकत नाहीत, पापांचा तर प्रश्नच येत नाही.''

असे नाही की पुण्यांचे आपणांस काहीच फळ मिळत नाही. पुण्यांचे फळ म्हणून बरेच काही मिळते. आज जर आपल्या हातात झाडू असेल, तर ती जाऊन सत्तेची प्राप्ती होते. झोपडीत वास्तव्य असेल तर महालाचे सुख प्राप्त होते. थोडक्यात, आज आपल्या हातात लोखंडाच्या बेड्या असतील, तर त्याऐवजी सोन्याचे साखळदंड मिळतात. परंतु अखेरीस बेडी ही बेडीच असते, मग भले ती लोखंडाची असो वा सोन्याची. पुण्यकर्मांचे बक्षिस म्हणून आपण स्वर्गात जातो, परंतु तेथेदेखील शरीर आणि मन असतेच. जेथे तन आणि मन आहे, तेथे सुख कसे बरे लाभेल? मनामुळेच आज आपण बेचैन आहोत. जन्म–मृत्यु, विषय–विकारांचे दु:ख स्वर्गांतदेखील आहे.

तुम्ही पुराणातील गोष्ट ऐकता की कामेच्छा पूर्ण करण्यासाठी स्वर्गाचा राजा इंद्राने गौतम ऋषींच्या पत्नीचे सत्वभंग केले. स्वर्गात जर कामाची भूक नसती, तर इंद्राने एवढे मोठे कुकर्म का बरे केले असते? तुम्हीच विचार करा! तेथेदेखील तृप्ती नाही, शांती नाही. खरी शांती सच्चखंडामध्येच आहे.

कबीर साहेब सांगतात, आत्मा जेव्हा अंतर्यात डोंगर-पर्वतांची चढण चढत असतो, तेव्हा त्याच्या डोक्यावर पाप-पुण्यांचे ओझे असते. त्यामुळे चढण चढणे अवघड जाते. पुढे जावे म्हणून काळाचे दूत त्यास लाठीने मारतात की चल पुढे! मार खाल्ल्याने आत्म्यास तहान लागते व तो त्यावेळी पाणी मागतो. काळाचे दूत म्हणतात,''पाणी मोफत मिळणार नाही, त्यासाठी तुला मोबदला द्यावा लागेल.''

मुंबईत देखील अनेकदा पाण्याची टंचाई होते, तेव्हा पाणी विकत घ्यावे लागते. माझा स्वत:चा अनुभव आहे की, राजस्थानमध्येदेखील एके काळी एक भांडे पाणी एक रुपयास मिळत असे. त्यासाठी देखील वीस-वीस मैल अंतर दूर जावे लागत असे. याचप्रमाणे संतांनी अंतर्यातील वर्णन केलेली परिस्थिती चुकीची असू शकत नाही.

सन्तन की सुण साची साखी जो बोलण सो पेखण आखी।

आपणांस घाबरविण्यासाठी संतांनी हे लिहिलेले नाही, तर ते आपल्या फायद्यासाठी लिहिले आहे. आत्मा जेव्हा तेथे यमांकडे पाणी मागतो, तेव्हा ते मृत्युचे दूत म्हणतात की,''तू आम्हांस तुझे अमुक अमुक पुण्य दिल्यास तुला आम्ही पाणी देऊ.'' कारण पाप कोण घेईल. केरकचरा देऊन आपण पाणी किंवा इतर कोणतीही चांगली वस्तू मागितल्यास कोण देईल? ते आपल्याकडून धनाचीच मागणी करतील. त्यामुळे आत्मा स्वत:कडे जमा असलेले पुण्य तेथेच गमावून बसतो. पुढे आत्म्यांना धर्मराजासमोर उभे केले जाते. तो आपल्या कर्मांनुसार पुढील जन्म देतो. तो जन्म मिळाल्यावर पुन्हा आपण दु:खी-कष्टी होतो. कबीर साहेब सांगतात:

कबीरा गागर जल भरी, आज काल जाए है फूट।
गुर जिन चेतया आपणा, सो आध माझ लीजेंगे लूट।।

आपला हा देह एखाद्या कच्च्या घागरीसमान आहे. त्यामुळे तिला थोडा धक्का जरी लागला, तरी ती फुटेल. आपणांस जर सतगुरू लाभले नसतील, तर यम आपणांस धर्मराजासमोर जाण्याअगोदरच लुटतील. आपणांस कल्पना आहे की पोलीस चोर–दरोडेखोरांना मारहाण करून त्यांची संपत्ती लुटतात. त्यास मारहाण करून पोलीस त्यांना हवे तसेच त्यांच्याद्वारे वदवून घेतात. न्यायालयात गेल्यावर त्याच्याकडे काहीच बाकी उरत नाही. तेथे त्यास सजा सुनावली जाते. आयुष्यभर ती सजा भोगत, तो शेवटी मरण पावतो.

हीच अवस्था आत्म्याची असते. जी काही पुण्याची पुंजी आत्म्याने जमा केलेली असते, ती पुंजी वाटेत यम लुटतील, आत्म्यास त्यांच्या आधीन व्हावे लागेल. ते जे काही आत्म्याकडून वदवून घेतील, तेच त्या आत्म्यास बोलावे लागेल. अशी अवस्था या बिचाऱ्या आत्म्याची असते.

मक्का येथे चर्चा करीत असताना काजी रूकमदीन याने गुरू नानकदेवजींना विचारले, ''तुम्ही सतगुरूंची खूप स्तुती करता की, त्यांच्याशिवाय कोणताही आत्मा परमात्म्याच्या दरबारात जाऊ शकत नाही. सतगुरू आत्म्याच्या मदतीस कोठे येतात?'' गुरू नानकदेवजी म्हणाले, ''जी नदी या आत्म्यास पार करायची आहे, ती नदी अतिशय भयानक आहे. त्या नदीस हिंदू शास्त्रांमध्ये वैतरणा नदी असे संबोधले गेले आहे. ती नदी पू आणि रक्ताने भरून वाहत असून अतिशय तप्त आहे. एखाद्याने नदीमध्ये हात घातल्यास तो भाजतो, दुरवरूनच तिची उष्णता जाणवते.'' आपण पुढे म्हणता:

बे पीरा बे मुर्शिदा कोई न पूछे बात।

ज्याचा कोणी त्राता नाही, त्यास तेथे कोणीही विचारत नाही. आपले अमेरिकेत बहीण–भाऊ अथवा कोणी परिचयाचे राहत असतील तर अमेरिकेस आपण गेलो असता ते नक्कीच आपल्या स्वागतासाठी विमानतळावर येतील.

परंतु एखाद्याच्या परिचयाचे कोणी नसल्यास, तो बिचारा हातात पिशवी घेऊन एकटाच निघून जातो, त्यास कोण तेथे विचारतो?

जर एखाद्या मनुष्याने त्या देशामध्ये आणण्यास मनाई असलेले सामान आणल्यास, विमानतळावर त्यास कस्टम अधिकारी अटक करतात व शिक्षा देतात. त्याचप्रमाणे जेव्हा आपण धर्मराजाच्या कार्यालयात जातो, तेव्हा नामा व्यतिरिक्त सर्व गोष्टींवर तेथे दंड आकारला जातो. तेथे केवळ सुटका नामधारीचीच होते. गुरू नानकदेवजी सांगतात:

बिन नामें नहीं छूटस नानक सांची तरत उतारी।

नामाशिवाय परमात्म्याच्या दरबारात कोणीच जाऊ शकत नाही. परमात्मा संत–सतगुरूंना नामाचे भंडारी बनवून संसारात पाठवतो. येथे येऊन ते श्रीमंत–गरीब, सर्वच लोकांमध्ये नामरूपी दान मोफत वाटतात. ते दान, चोर चोरू शकत नाही, अग्नी जाळू शकत नाही, पाणी बुडवू शकत नाही. त्या दानाची नेहमी वाढ होत असते.

आत्म्यासोबत जाऊ शकणारी पुंजी केवळ नामरूपी दात आहे. सतगुरू नाम देते वेळी शिष्याच्या अंतर्यात एक विशिष्ट व्यवस्था करून ठेवतात, जेणेकरून आपण मागील जन्मांमध्ये केलेल्या वाईट कर्मांची परतफेड करता–करता, सोबत दररोज पारमार्थिक उन्नतीदेखील करीत राहतो.

ठगो ने रोका सब संसार गुरु बिन पड़ गई सब पर धाड़।

आता आपण सांगता, या चोरांनी एका ठराविक कुळातील लोकांना किंवा एका ठराविक समाजातील लोकांना किंवा एका ठराविक देशांतील लोकांना वाममार्गावर लावलेले नसून, त्यांनी सर्व जगालाच वाममार्गावर नेऊन सोडले आहे. ते कोणास कळूच देत नाहीत की, कोणत्या मार्गाने गेल्यावर खऱ्या सुखाची प्राप्ती होईल. ज्यांना मनुष्य जन्मामध्ये पूर्ण सतगुरू भेटत नाहीत, त्यांना हे पाच चोर आजारांमध्ये फसवितात.

सतगुरूंशिवाय आपला कोणी रक्षणकर्ता नाही, आपल्यासाठी सहानुभूती बाळगणारा नाही, जो आम्हांस समजावेल की हे दरोडेखोर आपणांस अंतरातूनच दगा देत आहेत. आपणांस कल्पना आहे की, जेव्हा चोर, दरोडेखोर घरात येतात, तेव्हा जाताना ते पैसा-अडका बाकी काहीच ठेवत नाहीत. आजकाल चोर घरातील सर्वांना बांधून घरातच कोंडून ठेवतात.

मान लो कहना मेरा यार संग इन तजना पकड़ किनार।

संत-महात्मा आपणांस अत्यंत प्रेमाने समजावतात की, या दरोडेखोरांची मैत्री त्यागून गुरूंवर प्रेम करा, तेच तुमचे खरे मित्र, खरे रक्षणकर्ते आहेत.

गुरु बिन और न कोई रखवाल कहूँ मैं तुझसे बारम्बार।

आपण सांगत आहात, या जगात असा कोणी आहे, जो सजा म्हणून इतरांसाठी पेटविलेल्या अग्नीत उडी मारण्यासाठी तयार होईल, इतरांच्या दु:खांना आपल्या डोक्यावर घेईल? केवळ सतगुरूच असे आहेत की ते इतरांच्या दु:खास आपले दु:ख मानतात, सेवकावरील संकटास आपल्यावरील संकट मानतात. सेवक आणि सतगुरूंच्या दरम्यान अशा अनेक घटना घडत असतात, जेथे सेवक सतगुरूंसमोर उभा होऊन म्हणतो आणि पत्रांद्वारे देखील लिहितो की, आपण माझे रक्षण केलेत. ज्या प्रेमींच्या परिवारामधील आई-वडीलांना नाम मिळालेले नसते, ते प्रेमीदेखील येऊन सांगतात की, आपण माझ्या आईचे, माझ्या वडिलांचे रक्षण केलेत. आम्ही स्वत: पाहिले आहे की, हा सतगुरूंचा खेळ, त्यांचे प्रेम आहे. ते सत्संगींच्या मुलांवर त्यांच्या पशु-पक्षांवर देखील प्रेम करतात आणि त्यांचे संरक्षण करतात.

होयगी मंजिल तेरी पार गुरु से कर ले दृढ़ कर प्यार।

प्रेम, विश्वास आणि श्रद्धा हे संतमताचे स्तंभ आहेत. घराचा पाया जर मजबूत असेल, तर ते हादरत किंवा डळमळत नाही. आपण जर संतमतात प्रेम, श्रद्धा व विश्वास घेऊन पदार्पण केल्यास, त्यात ध्यान-अभ्यास सर्वकाही



केल्याप्रमाणे असते. सतगुरूंवर पूर्ण श्रद्धा असल्यास, आपणांवर कितीही संकटे आली, तरी आपण हसत मुखाने त्यांना सामोरे जाऊ. सतगुरूंवर प्रेम असल्यास, त्यांनी दिलेल्या नामाचा आपण नक्कीच जप करू. सतगुरूंवर प्रेम असल्यास, त्यांचे भय देखील आपणास नक्कीच वाटेल. त्यांच्यासमोर आपण कोणतेही वाईट कर्म करणार नाही. म्हणून आपण प्रेमाने समजावता की सतगुरू प्रेमींना नाम दिल्यावर बेफिकीर राहत नाहीत. आत्म्यास परमात्म्यासमोर नेऊन उभे करणे ही सतगुरू आपली जबाबदारी मानतात. ते परमात्म्यास सांगतात, ''हा तुझा आत्मा आहे, जो तुला विसरला होता. तो आता स्वत:च्या चुकीची माफी मागण्यासाठी आलेला आहे.'' त्यादिवसा नंतरच सतगुरू त्या जीवाची काळजी करण्याचे सोडून देतात.

दररोज ध्यान–अभ्यास करणे म्हणजे फळाच्या पिकण्यासमान आहे. फळ पिकल्यानंतर ते तुटल्यास, ना त्या फांदीस काही दु:ख वाटते, ना त्या फळास दु:ख वाटते. आपण जेव्हा ध्यान–अभ्यास करीत अंतर्यात उच्चस्थानी जातो, शब्दरूपी परमात्म्यास प्रकट करतो, तेव्हा सतगुरू आपली काळजी करण्याचे सोडून देतात. त्यांना कल्पना असते की, या शिष्याने मी दिलेल्या शिकवणुकीनुसार अंमलबजावणी केली आहे, हाच माझा प्रिय पुत्र आहे.

गुरु के चरण पकड़ यह सार इन्द्री भोग भुलावत झाड़।
यही है ठगिया करत ठगार कहें राधा स्वामी तोहे पुकार।
शरण में आ जा लेंऊ संभार, नाम संग होजा होत उद्धार।।

स्वामीजी महाराजांनी या लहानशा वाणीत संतमत–गुरूमत खूप प्रेमाने समजावले की, मनुष्यजन्म खूप मौल्यवान आहे. यामध्ये परमात्म्याने त्याचा नामरूपी मुल्यवान हिरा ठेवलेला आहे. त्या हिऱ्यास, आपण एखाद्या ध्यान–अभ्यासाची कमाई केलेल्या महात्म्यांच्या शरणी जाऊनच प्राप्त करू शकतो.

परमात्म्याचे प्रिय, संत–महात्मे त्या नामरूपी हिऱ्यांची मोफत लयलूट करतात. तो हिरा अशी वस्तु आहे की ज्याची चोर चोरी करू शकत नाही, दरोडेखोर दरोडा टाळू शकत नाही. या जगातून आपल्यासोबत जाणारी ही एकच वस्तू आहे. महात्म्यांनी हिऱ्यांशी तुलना करून नामाचे मूल्य समजावले आहे, परंतु हिरे खरेतर केवळ मुल्यवान दगड असतात व नाम तर त्या हिऱ्यां पेक्षाही अधिक मौल्यवान असते. केवळ उदाहरण देण्यासाठी म्हणून त्यांनी नामास हिरा म्हटले आहे. खरेतर नाम जे काही आहे, ते नामच आहे. आपण त्याच्या महिमेचे वर्णन करू शकत नाही वा उपमा देऊ शकत नाही. आपण प्रेमाने समजावले की सतगुरू आपणांस शब्द–नामाशी जोडतात, कारण आपल्या अंतरात आपले पाच कट्टर शत्रु आपल्या आत्म्याचा घात करण्यासाठी टपलेले आहेत. आत्म्यासाठी शब्द–नाम अमृतासमान आहे. परंतु तेच शब्द–नाम या पाच शत्रूंसाठी विषासमान असते. आपण सांगता :

मन मूसा पिंगल भया पी पारा हर नाम।

उंदरास पकडायचे असल्यास समंजस लोक त्यास पारा पाजतात. पारा पिऊन तो उंदीर जिवंतच असतो, परंतु हालचाल मात्र करू शकत नाही. याचप्रमाणे आपण या पाच शत्रुंना काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार यांना शब्द–नामाची चव चाखावयास दिली, तर ते बांधले जातात, कारण यापेक्षा श्रेष्ठ चव आणखी कसलीच नसते. शब्द–नाम यांच्यासाठी विषाचे कार्य करते, परंतु ते आत्म्यासाठी अमृत असते.

आपलेदेखील कर्तव्य आहे की सतगुरूंना सोबत घेऊन आपण आपल्या मुक्कामी पोहचावे. या दरोडेखोरांपासून आपणांस सांभाळून नेणे हेच सतगुरूंचे ध्येय असते. संत–सतगुरू ना नवीन समाज बनविण्यासाठी येतात, ना ते अगोदर असलेला समाज नष्ट करण्यासाठी येतात. ते तर सांगतात, तुम्ही आपआपल्या समाजातच राहा,आपआपले वेश परिधान करा. ज्या परमात्म्याचा शोध तुम्ही घेत आहात, तो कोठे बाहेर नसून तुमच्या अंतरातच वसलेला आहे. चोवीस तास तो तुमची अंतर्यात वाट पाहात आहे. आजपर्यंत बाह्यजगात परमात्मा ना कुणास भेटलेला आहे ना तो भेटू शकतो. गुरू नानक सांगतात:

सब कुछ घर में कछु बाहर नाहीं, बाहर टोले सो भ्रम भुलाही।

ज्याची तुम्हांस गरज आहे, ज्यास तुम्ही भेटू इच्छिता, तो तुमच्या शरीरामध्येच आहे. बाह्यजगात त्यास शोधल्यास तो तुम्हाला सापडणार नाही. बाबा फरीदसाहेब त्यांच्या कलाममध्ये लिहितात:

जंगल जंगल क्या ढूंढे, वन कंडा मोड़े, वसे रब हयालिया जंगल क्या ढूंढें।

आपण सांगत आहात, तू का काटे तुडवित फिरत आहेस? का वणवण भटकत आहेस? ज्यास तू शोधत आहेस, तो तर तुझ्या अंतर्यातच बसलेला आहे. आपलेदेखील कर्तव्य आहे की, संत–महात्म्यांच्या सांगण्यानुसार आपले जीवन सफल करावे, मिळालेल्या संधीचा पुरेपूर लाभ घ्यावा.

***



अनमोल वचन

परमसंत अजायब सिंह महाराजांनी कार्यक्रमाच्या अखेरीस संगतला दिलेला संदेश
संत बानी आश्रम, १६ पी.एस. राजस्थान – ३१ ऑगस्ट १९८५

जेव्हा–जेव्हा संत–सतगुरू या संसारात आले, परमात्म्याने त्यांच्यावर अपार दया केली. सर्व संतांनी उदार व मोकळ्या हृदयाने दयेचा वर्षाव केला. वर्तमान युगात महान सतगुरू सावन–कृपाल या जगात आले,त्यांनी अध्यात्मिक मार्ग बंद होऊ दिला नाही, परमार्थिक खजिना उदार मनाने वाटला. परमार्थावर प्रेम करणाऱ्या भाग्यवान जीवांनी तो खजिना मनसोक्त लुटला.

सर्वत्र जगभर पसरलेल्या त्यांच्या शिष्यांच्या निकट जाण्याची संधी मला लाभली. खरेतर शाळा–कॉलेजला जाणारे अनेक विद्यार्थी असतात परंतु उच्च श्रेणी मिळवून पास होणारे विद्यार्थी फार कमी असतात. असे विद्यार्थी अभ्यास करतात व खऱ्या मनाने आपल्या आई–वडीलांच्या भावनेची कदर करतात, की त्यांनी आपल्यासाठी खूप त्रास काढले व आपल्या शिक्षणासाठी खूप पैसे खर्च केले. जे विद्यार्थी अभ्यास करीत नाहीत, अभ्यास करण्यास अंग चोरतात, ते पास होत नाहीत. त्याचप्रमाणे जे शिष्य प्रामाणिकपणे संतांच्या शिकवणीनुसार नामस्मरण करतात, ते अध्यात्मात संपन्न होतात व त्यांच्या हृदयात प्रेम उसळून येऊ लागते.

अर्जुन कृष्णाचा मित्र होता. एके दिवशी अर्जुनाने आपल्या प्रेमाची चर्चा केली की, ''मी जितके कृष्णावर प्रेम करतो, तितके प्रेम दुसरा कोणीही करीत नाही.'' कृष्ण म्हणाला, ''अर्जुना, प्रेम करणारे तर अनेक आहेत, ही गोष्ट एखाद्या प्रेमी भक्ताकडे गेल्यावरच कळते.'' त्यासाठी कृष्ण अर्जुनास राजा मोरध्वजाकडे घेऊन गेला. राजा मोरध्वजाने त्यांचा आदर–सत्कार केला. त्याने असा विचार केला नाही की लोक काय म्हणतील, राजा असून सुद्धा संतांच्या चरणी मग्न असतो?

कृष्ण त्यास म्हणाला की, ''आमच्या सोबत जो वाघ आहे, तो भुकेलेला आहे, परंतु त्याने ही अट ठेवलेली आहे की, जर एखाद्या आई–वडीलांनी आपल्या एकुलत्या–एक मुलास सर्व लोकांसमोर चिरल्यास तो त्या मुलास खाऊन आपली भूक भागवेल. परंतु तसे करताना त्या मुलाचे आई–वडील रडू नयेत. दान तेच घेतले जाते, जे खुषीने दिले जाते.''

राजाने विचार केला की, त्यासाठी कोणाचा तरी मुलगा मागवून घ्यावा, परंतु अट ऐकून राजा खूप विचारात पडला. राणी खूप समंजस होती, ती म्हणाली, की भक्ती ही तेलाच्या (अतुट) धारेप्रमाणे असते, आपण भक्त आहोत. आपणांस भक्ती केली पाहिजे. आता ही भक्ती करवून घेण्याऱ्याची मर्जी आहे की त्याने कशा रीतीने भक्ती करवून घ्यावी! राजा–राणीने हुं का चुं न करता करवत मागविली. जेव्हा ते आपल्या एकूलत्या एक मुलास करवतीने चिरू लागले, तेव्हा राणीच्या डोळ्यातून पाणी वाहू लागले. कृष्ण म्हणाला, हे तर दान नाही, कारण राणी तर रडत आहे. त्या दोघांनी विनंती केली की,दान तर मनोभावे दिले जात आहे, परंतु मुलगा अजून लहान आहे, तरुण झालेला नाही. जर झाडावरून कच्चे फळ तोडले तर त्रास होतो.

भगवान कृष्णाने थोडीच मुलास करवतीने चीरून घ्यायचे होते? त्या मुलास वाघाचे भक्ष थोडीच बनवायचे होते? ही सर्व करामत केवळ अर्जुनास समजाविण्यासाठी केली गेली होती की, प्रेमी तर अनेक आहेत. अर्जुनाच्या मनात विचार आला की, हाच प्रश्न जर मला केला गेला असता, तर काय मी ती अट पूर्ण करू शकलो असतो? अर्जुनाने आपल्या हृदयाचे परीक्षण केले की जेव्हा माझा मुलगा अभिमन्यु युद्धात मारला गेला, त्यावेळी माझी मन:स्थिती कशी झाली होती? आपल्या मुलाचे बलिदान देणे काही साधारण गोष्ट नव्हे, ती अत्यंत अवघड आहे.

मी पश्चिमी देशांतील अनेक खऱ्या व सच्च्या प्रेमींना भेटलो आहे, ज्यांनी कोणत्याही गोष्टीचा त्याग करण्यास मागे–पुढे पाहिले नाही. आज

तेच लोक, पर्वतांच्या शिखरांवर असोत का समुद्राच्या तळाशी असोत, उत्साहाने महाराज सावन–कृपालजींची भजने गाऊन, ध्यान–अभ्यास करून आपले जीवन सफल करीत आहेत.

मी नेहमी सांगतो की, गुरूंच्या महानतेचे वर्णन त्यांचा शिष्यच ऐकू शकतो. महाराज सावन सिंहजी सांगत असत की,''केवळ नाम घेऊन मनुष्य सत्संगी बनत नाही. आपण संतांकडून शब्द नामाकडे पोहोचण्याचा मार्ग प्राप्त करतो.'' मी एके दिवशी सत्संगात सांगितले होते की:

नाम रहे चौथे पद माहीं, तू ढूंढे त्रिलोकी माहीं।
तीन लोक में वसदा काल, चौथे में रहे पुरख दयाल ।।

केवळ तोच सत्संगी आहे, जो मन–इंद्रियांच्या लहरीं पलिकडे गेलेला असतो, ज्याचा सत्याशी संपर्क झालेला असतो, ज्याने अंतर्यात सतगुरूंना प्रगट केलेले असते व ज्याच्या अंत:करणात गुरूप्रेमाची तळमळ असते. अशा सत्संगी व्यक्तीच्या अंतरात कोणाबद्दलही घृणा वा द्वेश नसतो. सतगुरूंचे गुणगाण करणे त्याचे जीवन असते. जिथे त्याच्या गुरूंविषयी चर्चा होत नाही, त्या सभेस तो व्यर्थ समजून धिक्कारतो. एक महात्मा म्हणतात:

गल्ल न करण यार दी, जित्थे ओह सभा दरकार नहीं।

मी पाश्चिमात्य देशांत गेलो आहे. भजने पंजाबी भाषेत लिहिली गेलेली आहेत. ती भजने गाण्यासाठी पश्चिमी प्रेमींना नाईलाजाने पंजाबी भाषा शिकावी लागली. ते जोडीने एका तालात दोन–तीन तास बसून भजने गातात, कारण त्यांच्या अंत:करणात प्रेम जागृत झालेले असते. त्यांच्या तोंडून महाराज कृपालजींच्या नावाखेरीज एकही भजन निघत नाही. आजही महाराज सावन–कृपालजींची ताकद आपली मदत करीत आहे. आजही आपणांस अशी हजारो माणसे भेटतील जे या गोष्टीची साक्ष देतात की जेव्हा तुम्ही सत्संग करीत होता, तेव्हा आम्ही महाराज सावन–कृपालजींना पाहिले.

हल्लीच मी व्हँकुवर शहरात गेलो, तेव्हा तेथील अनेक प्रेमी म्हणाले की, ''आपल्या डोक्यापाशी तीन व्यक्ती उभे आहेत. दोन व्यक्तींना तर आम्ही ओळखले, परंतु तिसऱ्या व्यक्तीस आम्ही ओळखत नाही. त्यांनी डोक्यावर पगडी लपेटलेली आहे व त्यांनी अत्यंत साधे कपडे घातलेले आहेत. ते कोण आहेत?'' मी त्यांस म्हटले की, ''ते बाबा बिशनदासजी आहेत.''

संत–सतगुरू सचखंडास पोहोचून शिष्यास विसरत नाहीत. ते आजही उपस्थित आहेत. महाराज सावन सिंहजींना देहरुपाने या संसारातून जाऊन कितीही काळ जरी लोटला असला, तरी सत्संग करताना अनेकांना महाराज सावन व कृपालजींच्या ज्योतीचा साक्षात्कार होतो.

जेव्हा विरोधींना हे विचारले गेले की अजायबच्या मस्तकापाशी हे दोन्ही गुरू का दिसतात? तेव्हा ते म्हणाले की, ही केवळ कल्पना आहे. त्यांना विचारले गेले की ही कल्पना आपल्या मस्तकापाशी का दिसत नाही?

महाराज सावन–कृपाल खूप दयाळू आहेत. ते आजही आपल्या अंग–संग आहेत व आपली सर्व कामे करीत आहेत. ते प्रत्येक सेवकाच्या अंग–संग आहेत, परंतु सेवक बनणे अत्यंत कठीण आहे. परमात्मा कृपालजींनी आपल्यावर खूप दया केली, आपणा सर्वांस दहा दिवस त्यांचे नामस्मरण

करण्याची संधी दिली. आज सर्वजण संसारिक गोष्टींच्या विचारात मग्न आहेत. आजच्या जगातील मनुष्य दहा दिवस काय, एक तास सुद्धा परमार्थ मार्गी लावू शकत नाही. ही तर आपल्यावर अपार दया झालेली आहे की त्यांनी आपणांस त्यांच्या स्मरणात बसण्याची संधी दिली. सतगुरू आपल्या मर्जीनुसार एखाद्यास त्यांच्या स्मरणात बसवू शकतात व एखाद्यास त्यांचा विसर पाडू शकतात, हे सर्व सतगुरूंच्या हाती असते. गुरू नानक म्हणतात:

ज्यों बुलावे त्यों नानक दास बोले ।

आपण आपल्या गुरूंना सांगता की आमच्यात ताकद नाही, आमच्याकडून तुम्ही जे काही वदविता तेच आम्ही बोलतो. या गोष्टीचा समज तेव्हाच येतो, जेव्हा आपले आंतरिक नेत्र उघडतात की, कोण आमच्याकडून वदवून घेत आहे? अनेकजण संतांची नक्कल करतात. ते वरच्या उच्च मंडळांच्या गोष्टी या संसारात ढाळण्याचा प्रयत्न करतात. जेव्हा आपण दशमद्वारापलिकडे जाऊन आपल्या आत्म्यावरील तीनही पडदे बाजूस सारतो, तेव्हा आपल्या लक्षात येते की, सर्व काही ते स्वत:हूनच करीत आहेत. गुरू नानक देवजी सांगतात:

करे कराए आपे आप ।

एखादी चांगली गोष्ट झाली तर आपण म्हणतो की हे मी केले. जेव्हा एखादी गोष्ट आपल्या आवाक्याबाहेर होते तेव्हा आपण ती गुरूंवर थोपतो की हे तर सतगुरूंच्या मर्जीनुसारच झालेले आहे, असे व्हायला नको होते.

मी आशा करतो की, आपण आपआपल्या घरी गेल्यानंतरही गुरूंचे स्मरण, त्यांची आठवण ताजी ठेवाल आणि आपण इथे जे काही ऐकलेत त्यावर अंमल कराल. वरच्या गच्चीवरदेखील मी आपणांस हेच सांगितले होते की, परतीचा प्रवास तुम्ही प्रेमाने व सद्भावनेने करावा, कोणाविषयी मनात घृणा व द्वेश बाळगू नये. फक्त काही तासांचाच प्रश्न आहे. ट्रेनच्या डब्यांमध्ये स्लीपर हल्लीच लावले गेले आहेत. ज्याकाळी आम्ही ट्रेनमध्ये प्रवास करायचो, त्याकाळी आम्हाला रात्रभर बसून प्रवास करावा लागत असे.

संतांचे हृदय हजारो आई–वडीलांच्या हृदयासमान असते. आपल्या मुलांशी विलाप होणे ही काही किरकोळ गोष्ट नसते, ती खूप कठीण असते. जसे तुमच्या डोळ्यात पाणी तरारलेले आहे, त्याप्रमाणे माझे हृदयही गहिवरून आलेले आहे. फरक इतकाच आहे की, आपण सर्व डोळ्यांतून अश्रू काढता आहात, परंतु मी कोणापुढे आपले अश्रू ढाळू. आपणांस इथून परत पाठविण्याची माझी इच्छा नाही, परंतु आपल्या सर्वांचे पूर्वकर्मांचे जंजाळ बाकी असून, त्यानुसार देणे–घेणे शिल्लक आहे, त्या कर्मांची परतफेड करणे अत्यंत जरूरी आहे.

एकदा महाराज सावन सिंहजींनी आपले गृहस्थी जीवन सोडून बाबा जयमल सिंहजींच्या चरणी राहण्याची विनंती केली होती. तेव्हा बाबा जयमल सिंहजी म्हणाले, ''तसे केल्यास मी तुला सचखंडात घेऊन जाऊ शकणार नाही. कारण देणे–घेणे पुन्हा जिवास खाली खेचून आणते. तुझ्यावर जी गृहस्थी जीवनाची जबाबदारी आहे, ती पूरी कर.'' म्हणूनच आपण सर्वांनी संसारिक बंधनांची जबाबदारी पूरी करा व त्यासोबत इथे जी शब्द–नामाच्या कमाईविषयी शिकवण मिळालेली आहे, त्यानुसार ध्यान–नामस्मरण करा.

आपले उच्च भाग्य होते की आपणांस परमात्म्याने भक्ती मार्गासाठी निवडले. गुरू आणि नाम त्याच आत्म्यांना मिळते ज्यांच्या निवडीचा निर्णय परमात्म्याने सचखंडातूनच केलेला असतो की मी त्यांना दु:खी संसारात पुन्हा पाठविणार नाही. नाम फार थोड्या लोकांच्याच नशिबी येते.

कोणताही मनुष्य धन–संपत्ती, पुत्र–पुत्री, मान–मोठेपणा इत्यादी प्राप्त करून, लग्न करून अथवा त्यागी बनून सुखी नाही, आपआपल्या जागी सर्वजण दु:खी आहेत. केवळ शब्द–नामाची कमाई (नामस्मरण) करणाराच केवळ सुखी आहे. नामस्मरण केल्यास आपले लक्ष त्या दिशेला लागते. आत्मा शब्द–नामाचे अमृत पिऊन बलवान होतो, मग आपण सुख–दु:खांची परवा करीत नाही.

मी जे काही थोडेफार तुम्हांस सांगितले आहे की आपण सर्वांनी आप आपल्या घरी जाऊन रोज प्रेमाने ध्यान–नामस्मरण करावे, सत्संगात हजेरी लावावी, महाराज कृपाल सिंहजी देखील सांगत असत की, ''शंभर कामं सोडून तुम्ही सत्संगात जा व हजार कामं सोडून तुम्ही ध्यान–अभ्यासात बसा. जोपर्यंत तुम्ही आपल्या आत्म्यास खुराक (अन्न) देत नाही, तोपर्यंत तुम्ही आपल्या शरीरास अन्न देऊ नका.'' आत्मा जन्म–जन्मांतरांपासून उपाशी आहे, दु:खी आहे. तेव्हा सर्वांनी ध्यान–नामस्मरण करावे.

सर्व सत्संगींनी एका कुटुंबातील सदस्यांप्रमाणे राहिले पाहिजे, आपसात प्रेमभावना राखली पाहिजे की ज्यामुळे शेजाऱ्या–पाजाऱ्यांनी देखील त्याचे अनुकरण करावे की यांनी ही गोष्ट कोठून प्राप्त केली.

मी नेहमी सांगतो की, कबीर साहेबांच्या एका शेजाऱ्याने त्यांची ख्याती पसरलेली पाहिली व विचार केला की मी तर कबीर साहेबांपेक्षा श्रीमंत आहे, हे गरीब आहेत, परंतु माझ्याभोवती माझा आदर करणारे इतके लोक नाहीत, यांच्याकडे तर खूप लोक येतात. इतकेच काय राजे–महाराजेदेखील यांचा आदर करतात. कबीरांकडे अशी कोणती वस्तू आहे?

त्याने कबीर साहेबांना विचारले,''आपल्याकडे असे कोणते औषध आहे ज्यामुळे लोक आपला आदर–सत्कार करतात. आपले गृहस्थी जीवन व कारभारदेखील ठिक चाललेला आहे.'' कबीर साहेब त्या दुनियादारीत गुंतलेल्या व्यक्तीस कसे बरे समजावू शकले असते? कारण त्यास अंतर्यातील गोष्ट समजणे खूप कठीण होते. ते त्यास आपल्या घरी घेऊन गेले. कबीर साहेब लोईस म्हणाले, ''तू रोहीच्या छपरातील माती घेऊन ये.'' लोईने सत्यवचन म्हटले व ती माती आणण्यासाठी गेली. माती आणून लोईने कबीर साहेबांना विचारले,''या मातीचे काय करायचे आहे?'' त्यावर कबीर साहेब म्हणाले,''या मातीला बारीक दळून, त्यास तुपात मिसळून त्याचा दीपक बनव व तो दीपक प्रज्वलीत करून पुन्हा त्या जागी ठेऊन ये.''



कबीर साहेबांनी जे काही सांगितले ते सर्व काही लोईने केले व आपले नामस्मरण देखील करीत राहिली की मला गुरूंनी ही आज्ञा दिलेली आहे. लोई सांगितल्याप्रमाणे सर्व काम करून हात जोडून कबीर साहेबांना म्हणाली, ''आता सांगा माझ्यासाठी काय आज्ञा आहे?'' कबीर साहेब म्हणाले,''आता तू आपली इतर कामं पहा, नामस्मरण कर.'' कबीर साहेबांनी त्या माणसास म्हटले की,''माझ्याकडे ही गोष्ट आहे. समजावण्याचा मुद्दा हा की आमचा आपसात चांगला ताळमेळ आहे व आम्ही एकमेकांनी सांगिलेले ऐकतो.''

त्या शेजाऱ्याने विचार केला ही कोणती मोठी कठीण गोष्ट आहे? त्याने घरी जाऊन आपल्या पत्नीस म्हटले, ''तू रोहीकडे जाऊन माती घेऊन ये.'' त्यावर त्याची पत्नी म्हणाली, ''तू दिवसभर काही काम करीत नाहीस आणि माझ्यावर हुकूम चालवतोस? तू स्वत: जाऊन माती आणू शकत नाहीस?'' तो म्हणाला, ''जर तू माती आणली नाहीस तर पहा! माझ्याकडे हा सोटा आहे.'' घाबरून ती माती आणण्यासाठी गेली. तिने नामस्मरण तर केलेच नाही आणि माती आणून ती त्यास म्हणाली, ''ही घे! ही माती तू

आपल्या डोंबलावर मारून घे.'' त्या शेजाऱ्याने पुन्हा आपल्या पत्नीस हुकूम दिला,''या मातीला बारीक दळून,तिला तूपात मिसळून, त्याचा दीपक बनव व तो दीपक प्रज्वलीत करून तिथेच ठेवून ये.'' त्याची पत्नी गोंगाट करू लागली की,''माझा पती बरा होता, त्यास भूतबाधा झालेली आहे.'' सर्वलोक तेथे जमा झाले. ते पाहून त्याशेजाऱ्याने लज्जेने आपले दात–ओठ आवळले. ते पाहून सर्व लोकांस खरेच वाटले की यास भूतबाधा झालेली आहे व त्यांनी भूतबाधेवर उपचारास्पद धूरी देणाऱ्या इसमास बोलावले.

जे काही झाले ते सर्व कबीर साहेबांना ठाऊक होते. कबीर साहेबांनी तिथे जाऊन म्हटले की, ''आपण सर्वजण बाहेर जा. ह्या रोगावर माझ्याकडे इलाज आहे, मी तो ठिक करेन.'' सर्वजण बाहेर गेल्यावर कबीर साहेब त्यास म्हणाले, ''हेच काम तर सर्वात जास्त कठीण आहे. आता तू गपचूप उठून उभा रहा, नाहीतर हे लोक तुला मिरचीची धूरी देऊन, तुझे नाक झोंबवतील व एका माणसाऐवजी तुला कोणतरी वेगळाच बनवतील.''

जर परमात्म्याने प्रेमाची देणगी दिली तरच आपण आपआपसात प्रेमभावना बनवून ठेवू शकतो. म्हणूनच आपण संगतमध्ये देखील प्रेमभावना राखली पाहिजे. जो संगतमध्ये प्रेमभावना राखेल तो घरीसुद्धा प्रेमभावना राखू शकेल. तेव्हा आपण सर्वांनी प्रेमाने व स्नेहाने आपले जीवन व्यतीत करावे, आपले मन शांत करावे. मी आपणांस ध्यान–अभ्यासाविषयी ज्या दोन–चार गोष्टी सांगितलेल्या आहेत, त्यावर अंमल करा.

सेवादारांनी मनोभावे सेवा केलेली आहे. मी त्या सर्व सेवादारांना धन्यवाद करतो. एखाद्या प्रेमीकडून सेवा करताना कोणावर एखादा शिंतोडा पडला असला किंवा एखादा तीक्ष्ण शब्द बोलला गेला असेल, ज्यामुळे कुणाचे जर हृदय दुखावले गेले असेल, तर मी सेवादारांच्या वतीने आपल्या सर्वांची माफी मागतो व आशा करतो की, आपण त्यांस माफ कराल. यापुढे ते आपली खूप चांगल्या रीतीने सेवा करू शकतील.

***

धन्य अजायब

परमसंत अजायब सिंह महाराजांच्या अपार दयेने **संतबानी आश्रम, १६ पी. एस. राजस्थान** येथे **सत्संगाचे कार्यक्रम** आयोजित केले जात आहेत. सर्व बंधू-भगिनींनींच्या चरणी नम्र विनंती आहे की त्यांनी कार्यक्रमात सहभागी होऊन आश्रमातील शांत वातावरणात ध्यान-अभ्यास करण्याचा व सत्संगाचा लाभ घ्यावा. कार्यक्रमांच्या तारखा:

२४ ते २६ ऑक्टोबर २०१४

२८ ते ३० नोव्हेंबर २०१४

२६ ते २८ डिसेंबर २०१४

तसेच परमसंत अजायब सिंह महाराजांच्या अपार दयेने **मुंबई शहरात** त्यांच्या मधुर आठवणीत **७ ते ११ जानेवारी २०१५** रोजी सत्संगाचा कार्यक्रम आयोजित केला जात आहे. सर्व बंधू-भगिनींनी कार्यक्रमात सहभागी होऊन नामस्मरणाचा व संतवचनांचा लाभ घ्यावा ही नम्र विनंती.